# १४

## सुधारणा कीं कुधारणा ?

शाहीर [illegible]
(सानिवडेकर)
१/२८, [illegible] चाळ,
गिरगांव, मुंबई ४ ४००००४)

### पोवाडा.

**ऐका** लोकानों ! पोवाडयाला । नारद इंद्रलोकिं गेला । देव सारा होता गोळा झाला । नारद त्यांना तंवा बोलला । " देवानों ! ऐका भाषणाला । स्वर्गाचा दिमाख पुरे झाला । स्वर्गावर मोठा घाला आला । तुमच्यावर मोठा घाला आला । मृत्युलोकाचा स्वर्ग झाला ! । माणसानं केलं करामतीला । जें जें नाहीं स्वर्गात या वेळा । तें तें मी पाहिलं नृलोकाला । माणूस प्रती देव झाला । कोणी विचारेना रे तुह्मांला ।। ।। ऐकावं ।। १ ।।

देव सारा कावरा बावरा झाला । घसा मग त्यांचा कोरडा पडला । एक त्यांनीं रेझोल्युशन (ठराव) केला । कीं भेटावं भगवान् विष्णूला । मग तय्यार केलं डेप्युटेशनाला (शिष्टमंडळ) । डेप्युटेसन गेलं भेटायाला । देव तंवा बोलले भगवानाला ।



१२

"आमच्यावर मोठा घाला आला । नारदानं सांगितलं आम्हांला । कीं माणसानं दुसरा स्वर्ग केला । मग कोण विचारणार आम्हांला ? । नारदाचं म्हणणं पडताळायला । कुणी तरी जावं नृलोकाला । चंद्र आणि सूर्य ही मदतीला । आपणच जावं कामगिरीला" । काळजी देवांची भगवानाला । भगवानानं जायचा विचार केला ॥ ऐकावं० ॥ २ ॥

विष्णु नररूपीं प्रगट झाला । गोपाळ नांव घेतलं आपणाला । गोपाळ मुंबईंत आला । रस्ता चकाचक्क दिसला त्याला। नित्य लोकांच्या कल्याणाला । रस्तोरस्त्याला शिपाई राहिला। मोटारींचा सुळसुळाट झाला। बीजगाड्यांनीं कहर केला। विमानं फिरतीं आकाशाला। माणूस मुळीं नव्हतं हो गायाला । पण गाण्याला रंग आला । पेटीला कंठ गोड फुटला । टॉकी-मधिं गोपू दंग झाला ॥ ऐकावं० ॥ ३ ॥

ताजमहाल हॉटेलांत गेला । प्यूननं बोलावलं आंत त्याला। बटन जरा दाबलन भिंतीला । सरसर लिफ्ट वरती गेला। जणु विमानाचा भास झाला । गोपाळ खोलीमंदीं गेला। कॉटवर जरा खालती बसला । गरगर पंखा वरती फिरला। इतक्यांत एक इसम आला । त्यानं गोपाळचा पाय धरला। अन् बूट काढून दूर ठेवला । मग एक चहाचा कप आला। बिस्किट होती बरोबरीला । चहाचा घोट घशांत गेला । सास





कप ढसा ढसा प्याला !। पंचपक्वानं भोजनाला । 'ट्रीटमेंट व्हेरी फाइन' बोलला । पत्र त्यानं लिवलं देवलोकाला । कीं "गोपाळ आज चहा प्याला; । चहानं लाजवलं अमृताला ! । येतांना आणीन तुम्हांला" ॥ ऐकावं० ॥ ४ ॥

गोपाळ सायंकाळीं गेला । चौपाटीवरती फिरायाला । देवलोकाचा भास झाला । होता किती लोक रंगलेला । होता जरी कैक वृद्ध झाला । तरी जुवानाचा ढंग केला । कलपानं केस काळा केला । पांढऱ्या चूर्णानं गोरा झाला । तेलानं घमघमाट केला । नटण्या थटण्याला ऊत आला ॥ ऐकावं० ॥५॥

गोपाळ गेला जर्मनीला । तत फ्यासनला ऊत आला । नवा नवा ढंग रोज झाला । गल्लोगल्लीं अप्सरांचा मेळा । हिटलर साहेब भेटला त्याला । त्यानं नेलं त्याला लेक्चराला । हिटलर लागला बोलायाला । "कंट्रीमेन । ऐका भाषणाला । राष्ट्रसंघानं ठराव केला । कीं जगामंदीं पीस (शांतता) नांदण्याला । डिस आर्मामेंट (शस्त्रसंन्यास) मंत्र झाला । खरोखर ठराव योग्य झाला । पण ऑनेस्टूली (प्रामाणिकपणें) सांगतों तुम्हांला । दुसऱ्या राष्ट्रांनीं अमलांत आणावं त्याला । पण फॉर द प्रेझंट (तूर्त) आमच्या देशाला । सवड नाहीं असल्या ठरावाला । दुसऱ्या देशांनीं जोर केला । आमच्यावर त्यांचा मोठा डोळा । फ्रान्सचं बिनसलय वाटतं मजला । अमेरिका

देश गबर झाला । बॅलन्स् ऑफ पावर (समानबलत्व) राखण्याला । तोफखाना वाढवला पाहिजे आम्हांला । विमानं लढणारी बांधण्याला । द्यावं तुम्ही आपल्या मंजुरीला " ॥ ॥ ऐकावं० ॥ ६ ॥

हिटलरानं नेलं गोपाळाला । युद्ध सामुग्री बघायाला । हिटलर बोलला गोपाळाला । " याला म्हणतात बाँब गोळा । एक गोळा मारतो शंभराला । हा एक जहरी गॅस (धूर) झाला । करतो रणीं ठार हजाराला । तोफेचा गोळा म्हणती याला । तट पाडण्यांत हुशार झाला । नुकतीच एक झाली मोठी लढाई, । त्यांत एक कोटि ठार झाला । हा लढाऊ जहाजांचा तांडा आला । विमानांचा मोठा तळ पडला." । गोपाळ बोलला हिटलराला । " कुणाला मारायचं यानं बोला । तुम्ही मर्त्य लोकाचा स्वर्ग केला । भाऊ भाऊ तुम्ही सगळे झाला । आंतवर झकपक झाला । शांतिचं राज्य दिसलं मजला " ॥ ॥ ऐकावं० ॥ ७ ॥

हिटलर लागला बोलायाला । " डिअर गोपाळ ! आम्हांला शांतता कुठं नको आहे ? । पण ॲज अ नेसेसिटी (जरूर म्हणून) हें सारें पाहिजे आम्हांला ! । नाश दुष्टांचा करायाला । जर मजुरांनीं गिल्ला केला । तर त्यांना ह्यानं समजावायला । ठेवणं भाग आहे आम्हांला । पण मात्र हृदयांत दुःख होतयं





कीं जगांत शांतता नांदत नाहीं म्हणून ! ! " ॥ ऐकावं० ॥८॥

गोपाळ गेला रशियाला । रक्ताचा चिखल दिसला त्याला । मुंडक्यांच्या माळा दिसल्या त्याला । गोपाळ देशोदेशीं गेला । सगळीकडं तोच प्रकार दिसला त्याला । भूलोकाचा वीट आला । अन् एक वर्सानं स्वर्गी गेला ! ॥ ऐकावं० ॥ ९ ॥

देवगण सम्दा गोळा झाला । भगवान् विष्णु बोलले त्याला । कीं " देवानों ! भीति नाहीं तुमच्या महात्म्याला । माणुस पक्का ढोंगी झाला । वरवर दिसतो सुधारलेला । आंत पर काळाकुट्ट झाला । गाळतो नक्राश्रु वेळोवेळा । स्वार्थ तर रोमरोमीं भरला । कृतज्ञता नाहीं ठाव त्याला । हत्तीवाणी मदोन्मत्त झाला । गरीबाची गणती नाहीं त्याला । बलवान छळतो दुर्बळाला । न्यायनीतिचा विचार सरला । ह्मणतो कल्चर्ड आपणाला । पण त्यानं केलय असल्या यंत्राला । कीं एक यंत्र एकावेळीं मारतयं लाखाला ! । ब्रूटाहून ब्रूट खास झाला । किती देश बंदिवान दिसला । दुरूनच रूप डोंगराला । किती जरी दिसला सुधारलेला । तरी जोंवर मनांमधिं नाहीं सुधारलेला । तंवर भिण्याचं कारण नाहीं तुह्मांला " ॥ ॥ ऐकावं० ॥ १० ॥

ऐकून अशा भाषणाला । देवांच्या जीवांत जीव आला । पांडुरंग गातो पोवाड्याला ॥ ऐकावं० ॥ ११ ॥